ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारताचे परराष्ट्र धोरण व सुरक्षा परिषदेत भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या दावेदारीचे औचित्य

**डॉ. राष्ट्रपाल गणवीर**
*प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख*
*महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर*

***सारांशः–***
*संयुक्त राष्ट्र संघ सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यतेच्या दावेदारीमध्ये भारताला 2021–22 साठी एकवेळ पुन्हा अस्थायी सदस्यता प्राप्त करण्यामध्ये यशस्वी झाला. 17 जून 2020 ला संयुक्त राष्ट्र संघ महासभेच्या 193 सदस्य देशांपैकी 184 देशांकडून भारताची 1 जानेवारी 2021 पासून 31 डिसेंबर 2022 पर्यंत या कालावधीसाठी अस्थायी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. अस्थायी सदस्यत्वासाठी झालेल्या निवडणुकीत भारतासोबत मेक्सिको, नार्वे, आयर्लंड, व केनिया सुद्धा अस्थायी सदस्यता प्राप्त करण्यात यशस्वी झाले. भारताने अस्थायी सदस्यता 8 वेळा प्राप्त केली आहे. यापूर्वी सुद्धा भारताने 1950–51, 1955–56, 1972–73, 1977–78, 1984–85, 1991–92, 2011–12 मध्ये सुरक्षा समितीचा अस्थायी सदस्य म्हणून आपली सेवा दिलेली आहे. परंतु भारत अनेक वर्षापासून सुरक्षा समितीचे स्थायी सदस्यत्व मिळावे यासाठी प्रयत्न करीत आलेला आहे. परंतु सध्यातरी भारताला स्थायी सदस्यता प्राप्त होण्यामध्ये अनेक अडचणी येवू शकतात.*
***की वर्ड–***
*भारत.....परराष्ट्र.......सुरक्षा......स्थायी......औचित्य*

**प्रस्तावनाः–**
1 जानेवारी 2021 पासून दोन वर्षासाठी भारत आठव्यांदा संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत अस्थायी सदस्य म्हणून कार्य करणार आहे. अस्थायी सदस्य राष्ट्राच्या निवडणुकीत भारताला महासभेत 193 सदस्य देशांपैकी 184 सदस्य देशांनी समर्थन दिले. हे निश्चितच जागतिक राजकारणामध्ये भारताच्या वाढत्या लोकप्रियतेचे उदाहरण म्हणावे लागेल. ही अस्थायी सदस्यता भारतासाठी एक नवी संधी आहे ज्यामुळे भारत जागतिक दहशतवाद, संपूर्ण मानवजातीचा विकास आणि संयुक्त राष्ट्रात लोकतांत्रिक सुधारणा करण्याच्या सिद्धांताला पुढे घेऊन जाऊ शकतो. मागच्या वर्षी 2019 मध्ये चीन आणि पाकिस्तान या देशांनी दोन वेळा काश्मीरचा मुद्दा सुरक्षा परिषदेत उठविण्याचा प्रयत्न केला होता परंतु सुरक्षा परिषदेच्या इतर देशांचे समर्थन न मिळाल्याने चीन व पाकिस्तान अलग थलग पडले होते. आता भारत स्वयं सुरक्षा परिषदेचा सदस्य बनणार आहे त्यामुळे काश्मीर वर चीन व पाकिस्तानची रणनीति यशस्वी होऊ शकणार नाही.
जर आपण भारताच्या सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्यत्वाचा विचार करतो म्हटले तर त्यात कोणत्याही प्रकारच्या प्रगतीची शक्यता फारच कमी दिसून येत आहे. वर्ष 2020 मध्ये संयुक्त राष्ट्रात सुधारणा करण्याचा जो प्रस्ताव तयार करण्यात आला आहे त्यात सुरक्षा परिषदेतील विस्ताराच्या काही सक्रिय व ठोस सुचना देण्यात आलेल्या नाही. एवढेच नाही तर सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्याच्या सुचनांनी कित्येक वेळा महासभेत दम तोडल्याचे दिसून येते. सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यतेच्या विस्तारासाठी अंतिमतः संयुक्त राष्ट्राच्या चार्टरमधील अनुच्छेद 23 मध्ये संशोधन करावे लागेल. चार्टरमधील अनुच्छेद 23 मध्येच सुरक्षा परिषदेच्या 5 स्थायी सदस्य राष्ट्रांच्या नावांचा उल्लेख करण्यात आला आहे. संयुक्त राष्ट्राच्या चार्टर मध्ये संशोधन करण्यासाठी महासभेच्या दोन तृतियांश सदस्यांच्या मंजुरीसोबतच सुरक्षा परिषदेच्या सर्व स्थायी सदस्य राष्ट्रांच्या मंजुरीचीही आवश्यकता असते. चार्टर मध्ये संशोधन करण्याच्या प्रक्रियेचा उल्लेख चार्टरमधील अनुच्छेद 108 मध्ये करण्यात आला आहे. सुरक्षा परिषदेत भारताला स्थायी सदस्यत्वासाठी महासभेत दोन तृतियांश बहुमत मिळण्याची शक्यता तर आहे परंतु सुरक्षा परिषदेच्या सर्व पाचही स्थायी सदस्य राष्ट्रांचे समर्थन मिळण्याची शक्यता फारच कमी किंबहुंना ती नसल्यासारखीच आहे. चीनला सोडून अन्य चार स्थायी सदस्य देशांनी आत्तापर्यंत तोंडी स्वरूपात भारताच्या स्थायी सदस्यत्वाचे समर्थन केले आहे परंतु चीनने तर आतापर्यंत तोंडी स्वरूपातही भारताच्या सदस्यत्वाचे असे समर्थन केलेले नाही. तरीही वर्तमानात सुरक्षा परिषदेमध्ये भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या परिस्थितीला समजण्यासाठी भारताने केलेल्या दाव्यांचा किंवा त्यादिशेने झालेल्या प्रगतीचा विचार करणे आवश्यक आहे.
सुरक्षा परिषद ही संयुक्त राष्ट्राचे एक कार्यकारी अंग आहे व त्याचे मुख्य कार्य जगात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे आहे. हाच संयुक्त राष्ट्राचा मुख्य उद्देश आहे. वर्तमान काळात सुरक्षा परिषदेमध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात तीन तर्क दिले जातात. जसे–पहिला तर्क असा की, सुरक्षा परिषदेचा जो ढॉचा 1945 मध्ये तयार करण्यात आला होता तो 21 व्या शतकात बदललेल्या शक्तीसंतुलनाशी अनुरूप नाही. उदा. जर्मनी यावेळी युरोपमधील सर्वात मोठी आर्थिक सत्ता आहे परंतु तो सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य देश नाही आहे. तर दुसरीकडे इंग्लंड व फ्रान्स स्थायी सदस्य देश आहेत. भारत व जपान यंची त्यांच्यापेक्षा मोठी अर्थव्यवस्था असूनसुद्धा सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य नाहीत. दुसरा तर्क असा की, सुरक्षा परिषद वर्तमान काळातील जागतिक समस्यांचा ुकाबला करण्यासाठी प्रभावी नाही. जेव्हा संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना झाली

होती तेव्हा शीतयुद्धाची सुरवात झाली होती आणि जेव्हा 1991 मध्ये सोव्हिएट संघाचे विघटन झाले व शीतयुद्धाची समाप्ती झाली तेव्हा सुरक्षा परिषदेला बदलत्या परिस्थितीत प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता वाटू लागली. आज जगात दहशतवाद, मानवाधिकारांचे उल्लंघन, जलवायु परिवर्तन इत्यांदी समस्यांचा सामना करण्यासाठी सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. तिसरा तर्क की, सुरक्षा परिषद व संयुक्त राष्ट्र संघाच्या अन्य विभागांच्या लोकशाहीकरणाचा आहे. जगाची लोकसंख्या व देशांच्या संख्येच्या विस्ताराबरोबरच त्याच्या प्रतिनिधित्वामध्येही परिवर्तन केले जाणे आवश्यक आहे.

**भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या दाव्याचा आधारः—**

भारत हा एक संयुक्त राष्ट्र संघाचा संस्थापक देश आहे तसेच जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा देश आहे. भारताला आतापर्यंत आठवेळा (1950—51, 1955—56, 1972—73, 1977—78, 1984—85, 1991—92, 2011—12 आणि 2021—22) सुरक्षा परिषदेचा अस्थायी सदस्य म्हणून निवडण्यात आले आहे. 2020 मध्ये भारताला अस्थायी सदस्यत्वाच्या निवडणुकीत जगातील देशांचे अभूतपूर्व समर्थन प्राप्त झालेले आहे. जर भारताला सुरक्षा परिषदेची स्थायी सदस्यता प्राप्त झाली तर भारताला जागतीक घटनांमध्ये व्हेटोचा (नकाराधिकार) अधिकार प्राप्त होईल. जागतीक स्तरावर भारताची भूमिका व प्रभावात वृद्धी होईल. दक्षिण आशियात चीन व पाकिस्तानच्या वाढत्या सामुहिक गठबंधनाच्या परिसिमेत शक्ति संतुलन भारताच्या बाजूने बदलेल. कारण चीन आधीच सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य देश आहे. या पृष्ठभूमित भारतानेही सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यत्वासाठी प्रबल दावेदारी प्रस्तुत केली आहे. भारताची दावेदारी खालील आधारावर प्रस्तुत करण्यात आली आहे.

**बदलत्या परिस्थितीत सुधारणा आवश्यकः—**

संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना 1945 मध्ये 75 वर्षापूर्वी झाली होती. तेव्हा जगातील 5 बड्याा व शक्तीशाली राष्ट्रांना सुरक्षा परिषदेची स्थायी सदस्यता प्रदान करण्यात आली होती. तेव्हापासून आतापर्यंत राष्ट्रांची शक्ती आणि त्यांच्या क्षमतांमध्ये व्यापक परिवर्तन झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सध्याची सुरक्षा परिषद वर्तमान जगाच्या वास्तविकतांची प्रतिनिधित्व व परिपूर्ती करीत नाही. भारत आपल्या आर्थिक व तांत्रिक विकासामुळे जगातील 8 वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनलेली आहे. जर क्रयशक्ती समतुल्यतेच्या दृष्टीने सकल राष्ट्रीय उत्पादनाची गणना केली तर अमेरिका, चीन, जपान आणि जर्मनीच्या नंतर भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. येथे दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, जेथे इंग्लंड व फ्रान्स सारख्या छोटी अर्थव्यवस्था असलेले देश सुरक्षा समितीचे स्थायी सभासद आहेत आणि भारत, ब्राझील, जर्मनी व जपान यासारखे देश तिच्या स्थायी सदस्यत्वापासून वंचित आहेत. म्हणून सुरक्षा समितीला प्रभावी बनविण्यासाठी ही विसंगती दूर करणे आवश्यक आहे.

**भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा देशः—**

भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा देश आहे तसेच लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केल्यास जगातील दुसरा सर्वात मोठा देश आहे. आकाराच्या दृष्टीने सुद्धा भारत एक मोठा देश आहे. भारतात 16 वेळा शांततापूर्ण पद्धतीने सत्ता परिवर्तन झाालेले आहे. भारत कायद्याच्या राज्याचा व लोकशाही शासनाचा प्रभावीपणे पुरस्कार करणारा देश आहे. जागतिक शांततेचा भारताने नेहमीच पुरस्कार केलेला आहे. भारताने जगातील अन्य देशांमध्येही लोकशाही निर्माण करण्याच्या प्रयत्नांना आपले समर्थन दिलेले आहे. आफ्रिका व आशिया खंडातील अनेक देश आपल्या देशातील लोकशाहीचे रक्षण करू शकले नाही. आज सर्वत्र ही गोष्ट स्वीकार करण्यात आली आहे की, लोकशाहीच जागतिक शांतता व सुरक्षिततेची सर्वात मोठी गॅरंटी देवू शकते.

**यूनोच्या आधारभूत सिद्धांताप्रती आस्थाः—**

भारत संयुक्त राष्ट्र संघाचा संस्थापक देश आहे व त्याने सदैव संयुक्त राष्ट्र संघाच्या सिद्धांतावर विश्वास व्यक्त केला आहे. भारत हा सर्व देशांची समानता, सार्वभौमत्व आणि मानवाधिकारांचा समर्थक देश आहे. सोबतच भारत आपसातील विवादांच्या शांतीपूर्ण समाधानावर विश्वास ठेवणारा आहे. भारताने आपल्या संविधानाच्या नीति निर्देशक तत्वाच्या अंतर्गत सुद्धा शांतता व सुरक्षितता या सिद्धांतांना समाविष्ठ केले आहे. 1954 मध्ये भारताकडून प्रतिपादित केलेला पंचशील सिद्धांत व भारताच्या गटनिरपेक्षतेचे धोरण संयुक्त राष्ट्र संघाच्या आधारभूत सिद्धांतांशी अनुकुल आहेत. भारत आंतरराष्ट्रीय विवादांमध्ये छळ—कपट या ऐवजी निष्ठेने व प्रामाणिकपणे एक जबाबदार राष्ट्र म्हणून आपली भूमिका बजावत आलेला आहे. वाशिंग्टन पोस्टच्या एका अहवालानुसार 1955 मध्ये अमेरिका व सोव्हिएट संघाकडून चीन ऐवजी भारताला सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व देण्याचा प्रस्ताव देण्यात आला होता कारण त्यावेळी भारत साम्यवादी चीनला स्थायी सदस्य बनविण्यासाठी प्रयत्न करीत होता. 1949 मध्ये राष्ट्रवादी चीनच्या पराजयानंतर हे पद खाली पडलेले होते.

**जगतिक शांतता प्रस्थापनेमध्ये भारताचे योगदानः—**

जागतिक शांतता व सुरक्षितता हा संयुक्त राष्ट्र संघाचा आधारभूत उद्देश आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने मागील 73 वर्षांमध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या उद्देशांची पूर्तता करण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. 1953 मध्ये भारताच्या विजया लक्ष्मी पंडित या संयुक्त राष्ट्र संघा महासभेच्या अध्यक्ष म्हणून निवडण्यात आल्या होत्या. भारताने कोरिया युद्ध, 1950—53 तसेच हिन्द चीन समस्येत मध्यस्थता करून शांतता प्रस्थापित करण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पाडली होती. भारताने वसाहतवाद, सांम्राज्यवाद व रंगभेद नीतिचा सदैव विरोध

केलेला आहे आणि गटनिरपेक्ष आंदोलनाच्या माध्यमातून गरीब देशांच्या समस्यांना पटलावर आणले. 1985 मध्ये संयुक्त राष्ट्रात भारताचे तत्कालिन प्रतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी परमाणु निःशस्त्रीकरणाची एक व्यापक योजना प्रस्तुत केली होती ज्यामध्ये सार्वभौमिक व पूर्ण निःशस्त्रीकरणाचा विचार करण्यात आला होता. संयुक्त राष्ट्र संघाच्या शांती सेनेमध्ये भारताचे योगदान उल्लेखनीय आहे. आतापर्यंत भारताने संयुक्त राष्ट्र संघाच्या 40 पेक्षा अधिक शांती मिशनमध्ये आपल्या जवळपास 1 लाख सैनिकांचे योगदान दिलेले आहे. याशिवाय भारत निःशस्त्रीकरण, मानवाधिकार, दहशतवाद, जलवायु परिवर्तन इत्यादी समस्यांचे समाधान करण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. म्हणून जागतिक शांततेत भारताचे योगदान सुरक्षा परिषदेत भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या दृष्टीने एक मजबूत आधार आहे.

**जागतिक घटनांमध्ये भारताची भूमिकाः—**

मागील 23 वर्षांमध्ये भारताने जलद गतीने आर्थिक व तांत्रिक प्रगती केली आहे. आज भारताची गणना जगातील एक उभरती आर्थिक शक्तींमध्ये केली जात आहे. भारताने मागील दोन दशकांमध्ये औसतन 7 टक्क्यांचा विकास दर प्राप्त केला आहे. जर मुद्रेच्या क्रय शक्तीला आधार मानले तर भारत अमेरिका, चीन, जपान व जर्मनीच्या नंतर जगातील पाचवी सर्वात मोठी शक्ती आहे. भारत आताही विकसनशील देशांचा सशक्त प्रतिनिधी आहे आणि अल्पविकसित देशांच्या विकासासाठी महत्वपूर्ण साझोदारीची भूमिका पार पाडत आहे. भारताच्या या वाढत्या जागतिक भूमिकेसाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत त्याला उचित स्थान प्राप्त होणे आवश्यक आहे. याबरोबरच भारत सध्याच्या प्रमुख संघटनांचा जसे—जी 20, ब्रिक्स, इब्सा इत्यादींचा प्रमुख सदस्य आहे व जागतिक व्यवस्थेच्या प्रबंधनामध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे.

**सुरक्षा परिषदेत सुधारणेची प्रगतीः—**

सुरक्षा समितीत स्थायी सदस्यत्वाच्या विस्ताराचा मुद्दा सर्वात आधी भारताने 1992 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या विशेष शिखर संमेलनात अत्यंत प्रभावी रीतीने उठविण्यात आला होता. यासंदर्भात महासभेकडून स्थापित कार्यदलाने 1996 मध्ये आपला अहवाल सादर केला ज्यामध्ये या मुद्यावर राष्ट्रांमध्ये आपसात सहमती बनविण्याची सुचना देण्यात आली होती.

अशाचप्रकारे संयुक्त राष्ट्र संघाचे महासचिव बुट्रोस घाली यांनी 2005 मध्ये 'इन लार्जर फ्रीडम' नावाच्या अहवालात सुरक्षा परिषदेची सदस्य संख्या 15 ऐवजी तिच्यात वाढ करून 24 करण्याचा प्रस्ताव देण्यात आला होता. परंतु या प्रस्तावावर सुद्धा आमसहमती होवू शकली नाही. याचे प्रमुख कारण हे आहे की, सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य व काही अन्य देश सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्याचा विरोध करीत आहेत. यावेळी सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यत्वाचे भारत, जर्मनी, जपान व ब्राझील हे चार देश प्रबळ दावेदार आहेत. या चारही देशांनी आपल्या संयुक्त दावेदारीसाठी जी—4 या नावाचे एक संघटन सुद्धा बनविले आहे. ही संघटना नियमितपणे बैठका घेवून चारही देशांना समर्थन मिळविण्याचे प्रयत्न करीत आहे.

स्थायी सदस्यत्वाच्या विस्ताराचा विरोध करणाऱ्या देशांनी 'काफी क्लब' नावाचे एक संघटन सुद्धा बनविले आहे. त्याला आता 'युनायटेड फॉर कान्सेन्सस्' या नावाने ओळखले जाते. यात इटली, स्पेन, अर्जेंनटाईन, कॅनडा, दक्षिण कोरिया, मेक्सिको व पाकिस्तान इत्यादी देश सामील आहेत. हे देश स्थायी सदस्यत्वाचा विरोध करीत आहेत. उदाहरणासाठी इटली व स्पेन जर्मनीचया स्थायी सदस्यत्वाचा विरोध करतात, अर्जेटिना व मेक्सिको ब्राझीलच्या सदस्यत्वाला विरोध करतात, दक्षिण कोरिया जपानच्या सदस्यत्वाला विरोध करीत आहे तर पाकिस्तान भारताच्या सदस्यत्वाला विरोध करीत आहे. चीनचा सुद्धा जपानच्या सदस्यत्वाला विरोध आहे तर भारताच्या बाबतीत चीनची स्थिती अनिश्चिततेची आहे. भारताचा सर्वात जास्त विरोध पाकिस्तानकडून केला जातो. चीनने आजपर्यंत उघडपणे भारताच्या सदस्यत्वाचे समर्थन केलेले नाही.

**निष्कर्षः—**

भारत संयुक्त राष्ट्राचा संस्थापक सदस्य राहिलेला आहे आणि त्याची संस्कृती, सभ्यता व विदेश नीति सुद्धा 'वसुधैव कुटुम्बकम्' तसेच पंचशील यासारख्या सिद्धांतावर आधारित आहे जी संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रमुख ध्येय आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता या सिद्धांताशी संबंधित आहे. जगातील अशा भारताच्या महत्वपूर्ण स्थितीचा विचार करून त्याला सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यत्व मिळावे ही मागणी अनेक दिवसांपासून करण्यात येत आहे. भारताची ही मागणी अनुचित आहे असे म्हणता येणार नाही. जगातील सर्वात मोठी लोकशाही असण्यासोबतच संयुक्त राष्ट्राचा उद्देश व त्याच्या कार्यप्रणलीप्रती समर्पणाची भावना ठेवणारा हा देश सर्व मापदण्डावर खरा उतरतो. मग तो संयुक्त राष्ट्रात आर्थिक योगदानाचा मुद्दा असो की संयुक्त राष्ट्र संघाच्या शांती सेनेत भागीदारीचा असो, संयुक्त राष्ट्र संघाच्या विभिन्न विभागांमध्ये सोपविलेल्या जबाबदारीचा मुद्दा असो की आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यामध्ये त्याची महत्वपूर्ण भूमिका असो, दहशतवाद, जलवायु परिवर्तन, मानवाधिकार उल्लंघन, गरीबी व भुखमारी इत्यादी मुद्यांवर संयुक्त राष्ट्र संघाद्वारे केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमध्ये सक्रिय भागीदारी भारताला सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यत्वाचा स्वाभाविक दावेदार बनवितो. भारत संयुक्त राष्ट्र संघाला किती महत्व देतो ते माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंच्या एका वक्तव्यानेच स्पष्ट होते. ते म्हणाले होते, 'संयुक्त राष्ट्र संघाने आमच्या जीवनात एवढे महत्वपूर्ण स्थान प्राप्त केलेले आहे की, त्याच्याशिवाय आम्ही जगाची कल्पनाच करू शकत नाही.'

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता, अहिंसा व गांधीवादी धोरणाच्या अनुकरणाचा पर्याय बनलेला भारत जर स्थायी

सदस्य बनला तर यामुळे जगातील इतर मागास व दुर्बल राज्यांना सशक्त नेतृत्व प्राप्त होईल. पूर्व मध्ये भारतीय सैनिकांनी संयुक्त राष्ट्र संघ शांती सेनेच्या माध्यमातून कांगो, सिएरा लिओन, सोमालिया अंगोला, रवांडा इत्यादी देशांमध्ये शांती स्थापनेमध्ये आपले महत्वपूर्ण योगदान दिले आहे. याबरोबरच स्थानीय समुदाय हेतूने शिक्षण, स्वास्थ्य, पेयजल, सडक निर्माण इत्यादींमध्ये सहायता करून आपले कर्तव्य प्रामाणिकतेने पूर्ण केले. भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या दाव्याला योग्य व न्यायोचित ठरवून भारताचे माजी पंतप्रधान स्व. इंद्रकुमार गुजराल यांनी सुद्धा म्हटले होते की, 'भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा देश आहे. आम्हाला हजारो वर्षांपासून चालत आलेली सभ्यता व संस्कृतीचा इतिहास आहे जी सार्वभौमिक परंपरा व मुल्यांनी ओतप्रोत भरलेली आहे. सरकारमध्ये सामान्य जनतेची भागीदारी आहे. याशिवाय आम्ही आपल्या अनुभवाच्या आधारावर जागतिक राजकारणात सकारात्मक भूमिका पार पाडण्यास इच्छुक आहोत. यामुळे सुरक्षा परिषदेचा फायदाच होईल.'

संयुक्त राष्ट्र संघाचे वर्तमान महासचिव एंटोनियो गुटेरेस यांनी सुद्धा भारताला स्थायी सदस्यता देण्याचे समर्थन केले आहे. आपल्या भारत यात्रेच्या दरम्यान त्यांनी म्हटले होते की, 'भारताच्या उमेदवारीच्या तर्काला कोणीही नकार देवू शकणार नाही. 130 करोड लोकसंख्या असणारा भारत देश जागतिक आर्थिक महाशक्ती बनण्याकडे वाटचाल करीत तर आहेच परंतु त्याने संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्व अभियानांमध्ये सुद्धा सक्रियतेने भाग घेतलेला आहे.' स्थायी सदस्यता प्राप्त करण्याचा मार्ग भारतासाठी एवढा सोपा सुद्धा नाही. वेळोवेळी अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स व रूस सारखे स्थायी सदस्य देश भारताच्या दावेदारीचे समर्थन करीत आलेले आहेत. परंतु कथनीला करनी मध्ये बदलणे एवढे सोपे सुद्धा नाही. भारताचे दोन कट्टर विरोधी शेजारी चीन व पाकिस्तान हे देश सुरक्षा समितीत भारताच्या स्थायी सदस्यतेचे कधीही समर्थन करणार नाहीत. चीन वेळोवेळी विभिन्न आंतरराष्ट्रीय मंचावर भारतासाठी अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. भारत सुरक्षा समितीचा स्थायी सदस्य बनून त्याला सुद्धा नकाराधिकार प्राप्त व्हावा हे चीन कधीही सहन करणार नाही. भारताच्या मार्गात जपान सुद्धा अडचणी निर्माण करू शकतो. आपल्या मजबूत आर्थिक स्थितीच्या जोरावर तो जगातील अनेक देशांना प्रभावित करू शकतो.

**ग्रंथ सुचीः–**


1. *डॉ. शर्मा मथुरालाल–आंतरराष्ट्रीय संबंध, कॉलेज बुक डेपो, जयपूर*
2. *शर्मा प्रभूदत्त– आंतरराष्ट्रीय राजनीतिकी विचारभूमी, प्रकाशक कॉलेज बुक डेपो जयपूर*
3. *वर्मा दिनानाथ– आंतरराष्ट्रीय संबंध, ज्ञानदा प्रकाशन पाटना*
4. *वेदालंकार हरिदत्त– आंतरराष्ट्रीय संबंध, सरस्वती दिल्ली*
5. *अग्रवाल रामेश्वरदयालू, गुप्ता कैलाशचंद्र– आंतरराष्ट्रीय राजनीति, जयप्रकाशनाथ कंपनी, मेरठ*
6. *डॉ. रायपूरकर वसंत– आंतरराष्ट्रीय संबंध, श्री मंगेश प्रकाशन नागपूर*
7. *दैनिक वर्तमान पत्रे–लोकमत, लोकसत्ता, सकाळ, महाराष्ट्र टाईम्स*
8. *प्रतियोगिता दर्पण– हिंदी मासिक*